Mrs.K.S.K.College,Beed

Dept.of Marathi

Event report -2020-2021

दि.१५ ऑगस्ट २०२० रोजी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने स्वातंत्र्यदिन विशेषांक भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.दि.२६ जानेवारी २०२१ रोजी विभागाच्या वतीने प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.दि.१० फेब्रुवारी २०२१ रोजी आकाशवाणी केंद्र बीड आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्‌यमाने कवी-संमेलनाचे आयोजन करण्यात आले.यामध्ये प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर, डॉ.सुरेखा जोशी, डॉ.अनिता शिंदे, डॉ.माया खांदाट,प्रा.जयश्री लामतुरे,डॉ.प्रज्ञा महेशमाळकर, डॉ. राजश्री तावरे, अंजली गवई ,सोनाली शहाणे आदीं कवयित्रींनी सहभाग नोंदविला.आकाशवाणी केंद्राचे निवेदक श्री.गोपाळ ठाकूर यांची या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती.

Head of the Department

मराठी विभागप्रमुख

सौ.के.एस.के.महाविद्यालय,बीड.

# कवींनी सादर केले स्त्रियांचे दुःख, सामाजिकतेवर कविता



के.एस.के.महाविद्यालयातील कविसंमेलन.

**प्रतिनिधी | बीड**

के.एस.के. महाविद्यालयातील मराठी विभाग व आकाशवाणी केंद्र बीड यांच्या संयुक्त विद्यमाने कविसंमेलन आयोजित केले होते. या वेळी आकाशवाणी केंद्राचे गोपाळ ठाकूर यांची विशेष उपस्थिती होती. दरम्यान, विविध कवींनी संमेलनात प्रेम, स्त्रियांचे दुःख, सामाजिक आशयाच्या कविता सादर केल्या. या प्रसंगी प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांनी आई गेल्यानंतर मुलीच्या जीवनात कशी पोकळी निर्माण होते ती आपल्या कवितेतून मांडली. प्रसिद्ध कवयित्री डॉ. सुहासिनी इर्लेकर यांच्या दोन हृदयस्पर्शी कविता सादर केल्या. या वेळी अनिता शिंदे, सुरेखा जोशी, माया खांदाट, जयश्री लामतुरे, प्रज्ञा महेशमाळकर, राजश्री तावरे, अंजली गवई, सोनाली शहाणे यांनी आपल्या कविता सादर केल्या. या वेळी मराठी विभागातील डॉ. मधुकर क्षीरसागर व पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. रेखा गुळवेसह महिला कर्मचारी कविसंमेलनाला उपस्थित होत्या. सूत्रसंचालन डॉ. सुरेखा जोशी व डॉ. अनिता शिंदे यांनी, तर आभार प्रा. बालासाहेब कटारे यांनी मानले.

दै. दिव्य मराठी, बीड
शुक्रवार, दि. १२
फेब्रुवारी २०२१

CS Scanned with CamScanner

दैनिक **लोकाशा** महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा

बुधवार दि.८ डिसेंबर २०२१ पान ३

# मा.आ. क्षीरसागरांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हास्तरीय निबंध लेखन स्पर्धा संपन्न

बीड, दि.७ (लोकाशा न्युज) : येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये मा.मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून जिल्हास्तरीय निबंध लेखन स्पर्धा (वरिष्ठ विभाग) घेण्यात आली. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सद्यस्थिती, बीड जिल्ह्याची सांस्कृतिक परंपरा : शोध आणि बोध आणि ऑनलाईन शिक्षण पध्दतीचे फायदे/तोटे या विषयावर ही स्पर्धा संपन्न झाली. बीड जिल्ह्यातील अनेक नामांकित महाविद्यालयाने या स्पर्धेत सहभाग नोंदवला. बीड, अंबाजोगाई, परळी, केज, वडवणी, पाटोदा आदी ठिकाणावरून अनेक विद्यार्थ्यांनी वरील विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी केलेले वैचारिक स्वरूपाचे निबंध पाठवून ही स्पर्धा यशस्वी केली. मा.मंत्री जयदत्तजी आण्णांना स्व.केशरकाकू चा समाजसेवेचा वारसा आहे.राजकारणात असूनही समाजसेवेलाच प्राधान्य ही मा. आण्णांची राजकारणातील भूमिका राहिलेली दिसते. मा.आण्णांच्या जन्म दिवसाचे औचित्य लक्षात घेऊन काही गंभीर आणि समाजाभिमूख विषयावर चिंतन, मनन, लेखन व्हावे या भूमिकेने महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाभरातील अनेक महाविद्यालयांच्या सक्रिय सहभागामुळे ही स्पर्धा कमालीची यशस्वी झाली.

CS Scanned with CamScanner

झुंजार नेता
दिनांक : २४ फेब्रुवारी २०२१ • वार: गुरूवार

# सौ.के.एस.के.महाविद्यालयातील मराठी, इंग्रजी व वनस्पतीशास्त्र विभागाला संशोधन केंद्र म्हणून मान्यता

बीड (प्रतिनिधी) सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी, इंग्राजी व वनस्पतीशास्त्र विभागांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या अंतर्गत पीएच.डी चे संशोधन केंद्र म्हणून विद्यापीठाकडून अधिकृत मान्यता देण्यात आली. सौ.के.एस.के. महाविद्यालयातील मराठी, इंग्राजी व वनस्पतीशास्त्र हे विभाग अग्रोसर विभाग म्हणून ओळखला जातात. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली तीनही विभागांना पीएच.डी संशोधन केंद्र म्हणून मान्यता मिळालेली आहे. येथे संशोधक विद्यार्थ्यांना संशोधनांसाठी आवश्यक असणारे साधन सामुग्री, ग्रांथालय सर्व सोयीनीयुक्त उपलब्ध आहेत. या पुढे या महाविद्यालयात पीएच.डी.पदवी घेण्याची सोय उपलब्ध झालेली आहे. सध्या सौ.के.एस.के.महाविद्यालयामध्ये मराठी, हिंदी, इंग्राजी, ग्राहशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र, वाणिज्य इ.विभाग संशोधन केंद्र म्हणून कार्यरत आहेत.

प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाने महाविद्यालयाची दिवसेंदिवस प्रगती होत असून संशोधन केंद्राच्या मान्यतेमुळे सर्व स्तरातून महाविद्यालयाचे कौतुक होत आहे. तरी नवीन नोंदणी करू इच्छिणार्या संशोधक विद्यार्थ्यांनी या संशोधन केंद्रामध्ये नोंदणी करावी. असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांनी केले आहे.

CS Scanned with CamScanner

दि.०९ फेब्रुवारी २०२२ संकेत

# प्राचार्य दिपाताई क्षीरसागर यांच्या पुस्तकाचे आज प्रकाशन



बीड दि.८ (बातमीदार): सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या ऊसतोड-महिला मजूरांची कथने असलेल्या आणि मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई या नामांकित प्रकाशन संस्थेकडून प्रकाशित झालेल्या 'झुंज तिची पाचटाशी' या ग्रंथाचा छोटेखानी प्रकाशन समारंभ बुधवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये होत आहे. या प्रकाशन समारंभ कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून माजी मंत्री मा.जयदत्त क्षीरसागर, उद्गीर येथे होणाऱ्या ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजीत अध्यक्ष भारत सासणे, सुप्रसिध्द कवी इंद्रजीत भालेराव, बीड शहराचे नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर आदींची उपस्थिती राहणार आहे.

कुशल आणि कार्यमग्न प्राचार्य, सुप्रसिध्द लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या म्हणून डॉ.दीपा क्षीरसागर यांना सबंध मराठवाडा ओळखतो. एवढेच नव्हे तर त्यांनी अनेकदा राजकीय पदावरही यशस्वीपणे काम केलेले आहे. संगीत, नाट्य, कला या क्षेत्रातही त्यांना उत्तम गती आहे. आजवर त्यांनी एकूण लिखीत आणि संपादित मिळून १४ ग्रंथाचे लेखन केलेले आहे. विषयवैविध्य असलेले त्यांची ही ग्रंथसंपदा साहित्य क्षेत्रात, शिक्षण क्षेत्रात आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरणारी आहे. दि.९ फेब्रुवारी रोजी प्रकाशित होत असलेले त्यांचे झुंज तिची पाचटाशी हे नवे पुस्तक बीड जिल्ह्यातील ऊसतोड महिला मजुरांची कथने असलेले पुस्तक आहे. लौकिक अर्थाने जरी बीड जिल्ह्यातील ऊसतोड महिला मजुरांच्या जीवनाचा भाष्य असले तरी, व्यापक अर्थाने यातील आशय संबंध भारतातील ऊसतोड महिला मजुरांच्या व्यथा वेदनांशी संवाद साधताना दिसतो. हे ललित स्वरूपाचे

(पान दोन वर...

बुधवार दि.०९ फेब्रुवारी २०२२ | राज्य लोकतंत्र

# आज प्राचार्या दिपा क्षीरसागर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

बीड: सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या उपक्रमशील आणि कुशल प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या ऊसतोड महिला मजूरांची कथने असलेल्या आणि मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई या नामांकित प्रकाशन संस्थेकडून प्रकाशित झालेल्या झुंज तिची पाचटाशी या ग्रंथाचा छोटेखानी प्रकाशन समारंभ बुधवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता सौ. के. एस. के महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये होत आहे. या प्रकाशन समारंभ कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून माजी मंत्री मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर, उदगीर येथे होणाऱ्या ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य समेलनाचे नियोजीत अध्यक्ष मा. भारत सासणे, सुप्रसिध्द कवी मा.इंद्रजीत भालेराव, बीड शहराचे नगराध्यक्ष मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर आदींची उपस्थिती राहणार आहे. कुशल आणि कार्यमग्न प्राचार्य, सुप्रसिध्द लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या म्हणून डॉ.दीपा क्षीरसागर यांना सबंध मराठवाडा ओळखतो. एवढेच नव्हे तर त्यांनी अनेकदा राजकीय पदावरही यशस्वीपणे काम केलेले आहे. संगीत, नाट्य, कला या क्षेत्रातही त्यांना उत्तम गती आहे. आजवर त्यांनी एकूण लिखीत आणि संपादित मिळून १४ ग्रंथाचे लेखन केलेले आहे. विषयवैविध्य असलेले त्यांची ही ग्रंथसंपदा साहित्य क्षेत्रात, शिक्षण क्षेत्रात आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरणारी आहे. दिनांक ९ फेब्रुवारी रोजी प्रकाशित होत असलेले त्यांचे झुंज तिची पाचटाशी हे नवे पुस्तक बीड जिल्ह्यातील ऊसतोड महिला मजुरांची कथने असलेले पुस्तक आहे. लौकिक अर्थाने जरी बीड जिल्ह्यातील ऊसतोड महिला मजुरांच्या जीवनावर भाष्य असले तरी, व्यापक अर्थाने यातील आशय सबंध भारतातील ऊसतोड महिला मजुरांच्या व्यथा वेदनांशी संवाद साधताना दिसतो. हे ललित स्वरूपाचे लेखन आहे. यातील पात्रांची नावे काल्पनिक आहेत तर गावांची नावे बदललेली आहेत. एक संवेदनशील लेखिका म्हणून डॉ.क्षीरसागर यांनी सदर महिलांची दुःखे जाणून घेऊन त्यांना कल्पनेच्या परिप्रेक्ष्यातून कागदावर मूर्तरूप प्राप्त करून देण्याचा केलेला प्रयत्न आहे. लेखिकेची समाजाप्रती असलेली सामाजिक बांधिलकी येथे अधोरेखित होताना दिसते. पुस्तकप्रेमी, वाचक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा आहे.

---

वार -गुरूवार दि.१०-०२-२०२२ | २ | चंपावतीपत्र

# झुंज तिची पाचटाशी पुस्तकात स्त्री शोषणाचे वास्तव-भारत सासणे

बीड । प्रतिनिधी

आपल्याकडे स्त्रियांच्या शोषणाचा प्रदीर्घ इतिहास आहे. रामायण महाभारताच्या काळापासून स्त्रियांच्या शोषणाचे संदर्भ सापडतात. सीतेपासून स्त्रियांच्या शोषणाची परंपरा स्पष्टपणे दिसू लागते. डॉ.दीपा क्षीरसागर यांनी लिहीलेले झुंज तिची पाचटाशी हे पुस्तक सध्याच्या काळातील स्त्री शोषणाचे वास्तव समोर आणते. झुंज तिची पाचटाशी हे एका अर्थाने ऊसतोड कामगार स्त्रियांची त्यांच्या जीवनाशी सदोदीत सुरू असलेली झुंजच




आहे असे प्रतिपादन उदगीर येथे होऊ घातलेल्या ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजीत अध्यक्ष भारत सासणे यांनी केले. डॉ.दीपा क्षीरसागर लिखीत झुंज तिची पाचटाशी या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते.

►► पान ७ वर

# स्त्रियांची जीवनाशी असलेली ही झुंज आहे - भारत सासणे

## डॉ.दिपाताई क्षीरसागर लिखीत झुंज तिची पाचटाशी पुस्तकाचे प्रकाशन

[illegible]




[illegible]

>>पान २ वर

CS Scanned with CamScanner

झुंजार नेता | दिनांक : ११ जानेवारी २०२१ | वार : मंगळवार | पान ७

# के.एस.के.महाविद्यालया मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा

बीड दि.१० (प्रतिनिधी): येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकूकला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागातंर्गत दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२२ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करण्यात आला.प्रतिवर्षी मराठी भाषेचे संवर्धन व जतन व्हावे याउद्देशाने मराठी भाषा पंधरवाडा महाविद्यालयाच्या मराठी विभागातंर्गत पंधरवाडा साजरा करण्यात येतो.या पंधरवाड्या दरम्यान भाषेची अभिवृध्दी होणारे अनेक उपक्रम तथा कार्यक्रम घेतले जातात. यावर्षी कार्यक्रमामध्ये प्राध्यापकांचे कवी संमेलन,विद्यार्थ्यांचे कवी संमेलन, एक तास वाचनाचा उपक्रम,ग्रांथ प्रदर्शनास भेट,निबंध लेखन स्पर्धा,हस्ताक्षर लेखन स्पर्धा,घोषवाक्य लेखन स्पर्धा,एका लेखकास भेट,कथा लेखन आणि कविता लेखन स्पर्धा असे नानाविध उपक्रम राबविण्यात आले.या उपक्रमांना महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांचे प्रोत्साहन व पाठबळ लाभले व तसेच मराठी विभागातील प्रा.डॉ.रामनाथ वाढे, प्रा.बालासाहेब कटारे यांनी हे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कार्य केले.त्यामध्ये महाविद्यालयातील उपप्राचार्य उपप्राचार्य डॉ.आबासाहेब हांगे, उपप्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.सतिष माऊलगे,कमवि उपप्राचार्य सय्यद लाल,पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर,तसेच महाविद्यालयातील विविध पदाधिकारी,प्राध्यापक,मराठी विभाग,विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने सहभागी होते.

दिवसाचा शुभारंभ...
कार्यारंभ
३ पान
मंगळवार, ११ जानेवारी २०२२

# बीडच्या केएसके महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा

प्रतिनिधी । बीड

दि.१० : येथील केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागातंर्गत दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२२ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करण्यात येत आहे. यांअंतर्गत विविध उपक्रम घेतले जात आहेत.

प्रतिवर्षी मराठी भाषेचे संवर्धन व जतन व्हावे याउद्देशाने मराठी भाषा पंधरवाडा महाविद्यालयाच्या मराठी विभागातंर्गत साजरा करण्यात येतो. यादरम्यान भाषेची अभिवृध्दी होणारे अनेक उपक्रम तथा कार्यक्रम घेतले जातात. यावर्षी कार्यक्रमामध्ये प्राध्यापकांचे कवी संमेलन, विद्यार्थ्यांचे कवी संमेलन, एक तास वाचनाचा उपक्रम, ग्रंथ प्रदर्शनास भेट, निबंध लेखन स्पर्धा, हस्ताक्षर लेखन स्पर्धा, घोषवाक्य लेखन स्पर्धा, एका लेखकास भेट, कथा लेखन आणि कविता लेखन स्पर्धा असे उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांना महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांचे प्रोत्साहन लाभले. मराठी विभागातील प्रा.डॉ. रामनाथ वाढे, प्रा.बालासाहेब कटारे यांनी हे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.




ग्रंथाची पाहणी करताना प्राध्यापक व विद्यार्थी




ग्रंथप्रदर्शनाच्या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांसह प्राध्यापक

CS Scanned with CamScanner




ग्रंथप्रदर्शनाला भेट - पदाधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी




ग्रंथप्रदर्शनाला भेट - पदाधिकारी व विद्यार्थी




एकतास वाचनाच्या उपक्रमात सहभागी विद्यार्थी




उपक्रमात सहभागी विद्यार्थी

CS Scanned with CamScanner




विद्यार्थी कविसंमेल कविता वाचन करताना विद्यार्थीनी




कविता वाचनाचा आस्वाद घेताना विद्यार्थी

CS Scanned with CamScanner




डॉ. शिनगारे यांचा सत्कार करताना उपप्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर समवेत अन्य मान्यवर




व्याख्यान देताना डॉ. शिनगारे

Scanned with CamScanner